# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१४४/२०२५ दिनांक- ३१/०३/२०२५

## प्रेस नोट

### Divine Mercy church मिरारोड येथे सायबर जनजागृतीबाबत कार्यक्रमाचे आयोजन!!

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात सामान्य नागरिकांमध्ये सायबर विषयक जनजागृती करण्याच्या उद्देशाने विविध ठिकाणी सायबर विषयक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याबाबत मा. पोलीस आयुक्त यांनी आदेशित केलेले आहे.

मा. पोलीस आयुक्त यांचे संकल्पनेतून दिनांक ३० मार्च २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता Divine Mercy church **मिरारोड येथे** सायबर पोलीस ठाणे येथील पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांनी **Cyber Awareness Programm** आयोजन करुन कार्यक्रमाकरीता उपस्थित असलेल्या १५०-१८० स्थानिक नागरिक उपस्थित होते. उपस्थित नागरीकांना सायबर जनजागृतीबाबत खालील विषयांवर सविस्तर माहिती देवून मार्गदर्शन केले.

१) सध्यस्थितीत घडणारे वेगवेगळे सायबर गुन्हे (Trending Cyber Crimes).
२) सोशल मिडीयासंदर्भात घडणारे गुन्हे (Social Media Related crimes/social media etiquette).
३) ऑनलाईन सायबर गुन्हयांस कश्याप्रकारे टाळता येईल याबाबतची माहिती (Precautions to be Taken).
४) ऑनलाईन गुन्हयास बळी पडल्यास तात्काळ कोठे व कश्याप्रकारे तक्रार नोंदविता येईल याबाबतची माहिती. (Where and How to Complaint ?).

सदर कार्यक्रमामध्ये २० ते ६५ वयोगटातील नागरीक उपस्थित होते. तसेच सदर कार्यक्रमामध्ये उपस्थित नागरीकांना दैनंदिन जिवनात इंटरनेटच्या माध्यामातुन होणारे आर्थिक व्यवहार व सोशल मिडीया संदर्भात आपण कसे सुरक्षित राहावे याबाबत महत्त्वपुर्ण अश्या सुचना देण्यात आल्यात. तसेच सायबर गुन्हे जनजागृतीबाबत पत्रक वाटप करण्यात आली. सदर कार्यक्रमाला उपस्थित श्रोत्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला, तसेच सदरच्या कार्यक्रमाबाबत सकारात्मक प्रतिक्रीया दिलेल्या आहेत.

सदरचा कार्यक्रम आयोजित करण्याकरीता Divine Mercy church चे फादर श्री. ऑलवीन, तसेच एन जी ओ ब्लेस फाउंडेशनचे कार्यकर्ते श्री. रसेल रोड्रीग्स, श्री. रोशन वर्गीस, श्री. रोशन बालीमाने, श्री. ऐफाज, श्री. कैसार सैयद, श्रीमती मानोक्शा मार्टीस, श्री. क्रिस्टल पिंटो, श्रीमती ईरिका पिंटो, श्रीमती पेलिशा टॅवरस यांनी परिश्रम घेतले. तसेच उपस्थित नागरीकांना सायबर जनजागृतीबाबत दिलेल्या माहिती व मार्गदर्शानकरीता मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे सायबर पोलीस ठाणेचे पोलिस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचे आभार मानले आहे.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, ऑनलाईन फसवणुकीचा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 OR 1945 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**




MBVV
CYBER AWARENESS
CYBER POLICE STATION





-----ooooo-------